# ज्ञानोबा माऊली

म. ग्रं. सं. ठाणे
ग्रं. क्र. ५०१



REFBK-0015053

# ज्ञानोबा माउली

## ज्ञानेश्वराची आळंदी

विश्रांतीचें स्थान। संतांचें माहेर
तें या भूमीवर। अलंकापूर॥
— एकनाथ


रामचंद्र चिंतामण ढेरे

किंमत
६०
पैसे


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

REFBK-0015053

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २



तापी नदी
धुळे
नाशिक
अजंठा
औरंगाबाद
पैठण
ठाणे
मुंबई
घारापुरी
अहमदनगर
बीड
पुणे
सातारा
हरिहरेश्वर
परशुराम
रत्नागिरी
कोल्हापूर
मिरज
पंढरपूर
सोलापूर
तुळजापूर




पंढरपूर–पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी – ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ, जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम, त्र्यंबकेश्वर-नाशिक – श्रीराम; चिंचवड – मोरया गोसावी, कोल्हापूर – महालक्ष्मी, औदुंबर-नरसोबाची वाडी – दत्तात्रय, तुळजापूर–भवानी, नेवासें–मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें–शांतादुर्गा; मंगेश–शंकर; भीमाशंकर – ज्योतिर्लिंग; परशुराम – परशुराम, शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे, गाणगापूर – नरसिंह सरस्वती; माहूर – दत्त, देवी, आंबे जोगाई– देवी, औंढ्या नागनाथ – ज्योतिर्लिंग, परळी वैजनाथ – ज्योतिर्लिंग, वेरूळ – लेणी, ज्योतिर्लिंग, नांदेड – गोदावरी, बीड – कंकालेश्वर, रामटेक – सीता-राम; सालबर्डी – यात्रा, अमरावती – अंबादेवी, मुक्तागिरी – जैन-क्षेत्र चांदा – महाकाली, शेगांव – गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग, कळम्ब – चिंतामणी, दक्षिणद्वार देवगिरी – दौलताबाद

श्री : ९८ २ [ ७–६५ ]

© वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा लि.

■

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन-माला - १६

■

आवृत्ति तिसरी
शके १८८७; सन १९६५

■

किंमत ६० पैसे

■

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्राचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्राय. लि करिता
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :
जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण, पुणें २

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्राचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि, त्या त्या स्थानांतील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रें, तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम यांची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें

या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचे समाधान अवश्य लाभेल

- मोठा, जाड टाइप, सोपी भाषा, आकर्षक मांडणी.
- हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रातील तीर्थ-यात्रा आणि संतदर्शनें, भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाश्यानाहि मार्गदर्शक शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त
- **डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई-राज्य-कडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस.**
- **लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत.**
- **असिस्टंट क्युरेटर ऑफ लायब्ररीज, महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेलीं.**



७५०५३

# ज्ञानोबामाऊली

## कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर :

ज्याच्या स्पर्शांतून फुलांनीं कोंवळीक शिकावी, वाणींतून अमृतानें माधुर्य लुटावें आणि दिठींतून पूर्णिमेनें शीतलता अनुभवावी, त्याचा सहवास किती सुखद असेल ! त्याच्या सहवासांत विष अमृताचा ध्यास घेत असेल, मरण चिरजीवनासाठीं तपस्वी बनत असेल आणि वेदना संतृप्तींत विरून जात असेल. याच कल्पनेनें माझें मन ज्ञानेश्वरांचा ध्यास घेतें, त्यांच्या आठवणीनें विव्हळ होतें. वाटतें, त्यांच्या संजीवक स्पर्शानें जीवनाचें सोनें व्हावें आणि त्यांच्या दिठीच्या चांदण्यांत अमृतानें न्हाऊन निघावें.

ज्यांनीं उभ्या महाराष्ट्राला माउलीची माया दिली, त्यांच्या दर्शनाची ओढ मनाला वाटावी, हें स्वभाविक आहे. या ओढीचें रहस्य एकनाथांनीं उत्कट शब्दांत व्यक्त केलें आहे :

कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर । तया नमस्कार वारवार ।
न पाहे यातीकुळाचा विचार । भक्तकरुणाकर ज्ञानाबाई ॥


भलतिया भावें शरण जातां भेटी । पाडितसे तुटी जन्मव्याधी ।
ज्ञानाबाई माझी अनाथाची माय । एका जनार्दनी पाय वंदितसे ॥

शिवपीठ हें जुनाट :

ज्ञानेश्वर म्हणजे सर्व महाराष्ट्राची माउली. 'ज्ञानोबा माउली' या जिव्हाळ्याच्या नांवानें सारीं मराठी मनें त्यांच्या पायाशीं विनम्र होतात; आपल्या उणीवांचा, दोषांचा, पापांचा नि दुबळेपणाचा पाढा वाचतात; आणि कृपेच्या पदराखालीं घेऊन ज्ञानाचा पान्हा पाजण्यासाठीं माउलीची विनवणी करतात. ही माउली जिथें अखेर विसांवली, ती आळंदी साधकांचें आणि भाविकांचें माहेर बनली आहे. आळंदीचा समग्र महिमा एकनाथांनीं एका अभंगांत गायिला आहे :

विश्रांतीचें स्थान, संताचें माहेर ।
तें या भूमीवर अलकापूर ॥
तये स्थळीं माझा, जीवींचा वो ठेवा ।
नमीन ज्ञानदेवा, जाऊनीया ॥
सिद्धेश्वरस्थान दरुशनें मुक्ती ।
ब्रह्मज्ञानभासी वटेश्वर ॥
चौऱ्याशीं सिद्धांचा, सिद्धबेटीं मेळा ।
प्रत्यक्ष स्थापिला कल्पवृक्ष ॥
अमृतमय पुढें वाहे इंद्रायणी ।
भागीरथी आदिकरूनि तीर्थराज ॥
ऐसिया स्थळीं समाधि ज्ञानदेव ।
एका जनार्दनी ठाव अलंकापूर ॥

हें विश्रांतीचें स्थान आणि संतांचें माहेर असलेलें आळंदी गांव पुण्यापासून सुमारें तेरा मैलांवर उत्तरेस इंद्रायणीतीरीं आहे.



इंद्रायणीतीरावरील आळंदी

पुण्याहून दोन-दोन तासांनीं आळंदीस जाणाऱ्या मोटारी मिळत असल्यामुळें ज्ञानेश्वरांचें दर्शन सर्वांना सुलभ आहे. पुण्याहून शिवाजीनगर मोटारतळावरून निघणारी मोटार पुणें स्टेशन, डेक्कन कॉलेज, बंडगार्डन-पूल, येरवडा, दिघी या मार्गानें आळंदीस जाते. आळंदींत प्रवेश करतांना इंद्रायणीवरील पूल लागतो. पुण्याचे ठा. मो. आगरवाल यांनीं सन १८२० मध्यें ऐंशी हजार रुपये खर्चून हा पूल बांधलेला आहे. हा पूल ओलांडून मोटार गांवांत नगरपालिकेजवळील तळावर थांबते.

मोटारींतून उतरल्यावर मनांत आळंदी-दर्शनाविषयीं विचार-चक्र सुरू होतें. आळंदीची प्रसिद्धि प्रामुख्यानें ज्ञानेश्वरांच्या समाधीमुळें असली तरी ज्ञानेश्वरांच्याहि पूर्वीं एक शिवपीठ म्हणून आळंदीचा महिमा वर्णिलेला आढळतो. पुराणांत 'सिद्धक्षेत्र' म्हणून आळंदीची महती गायिलेली आहे. आजहि इंद्रायणीच्या पात्रांत 'सिद्धबेट' या नांवाचें एक स्थान दाखवलें जातें. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं या सिद्धबेटाशीं अनेक सिद्ध पुरुषांचा संबंध आल्याचे उल्लेख संतांच्या अभंगांतून अनेक ठिकाणीं आढळतात.



श्रीसिद्धेश्वर

या उल्लेखांना पुष्टि देणारा आणखी एक दुवा आळंदीस अजूनहि आढळतो, तो म्हणजे आळंदीचें पुरातन सिद्धेश्वराचें स्थान. या सिद्धेश्वरामुळें असो वा शिवभक्त नाथयोग्यांच्या निवासामुळें असो, आळंदी हें शिवपीठ समजलें जात होतें, एवढें निश्चित. अर्थात् गेलीं सातशें वर्षें आळंदीचा महिमा गाजतो आहे तो ज्ञानेश्वरांमुळें. नाथांनीं अगदीं योग्य शब्दांत या उभयविध प्रसिद्धीचें मर्म सांगितलें आहे :

शिवपीठ हें जुनाट । ज्ञानाबाई तेथें मुगुट ॥

खऱ्या अर्थानें आळंदी हें आजहि 'शिवपीठ' आहे. ज्ञानेश्वरांचा वारसा शिवोपासक नाथ-परंपरेचा आहे; आणि ज्ञानेश्वरांचें समग्र जीवनच 'शिव' आहे – कल्याणकारी आहे. विश्वमंगलासाठीं हलाहल प्राशन करणाऱ्या नीलकण्ठ शिवाचाच वंश जणुं ज्ञानेश्वरांनीं भूषविला आहे. आपण 'महेशान्वयसंभूत' ( शिवाच्या वंशांत निर्माण झालेले ) आहोंत, अशी ज्ञानेश्वरांनीं स्वतःच ग्वाही दिली आहे.

स्कंद पुराणाच्या सह्याद्रि खंडांत ( अ. ६४ ) आनंदविपिन, वारुण, कपिल, अलका व सिद्धक्षेत्र अशीं आळंदीचीं पांच नांवें आलीं आहेत. नानेश्वरांच्या नाथ-परंपरेंतील बाळमुकुंद नांवाच्या

एका ग्रंथकारानें लिहिलेल्या अलका-माहात्म्यांत अलका, आनंद-वन, अलकावती अशीं नांवें आलीं आहेत. नामदेवांपासून तुकारामापर्यंतच्या संतांच्या अभंगांतहि अलंकापुरी, अलंकापूर, अलकावती अशीं नांवें येतात. शके ६९० च्या कृष्णराज राष्ट्र-कूटाच्या तळेगांव ताम्रपटांत 'अलन्दिय' असा आळंदीचा उल्लेख आढळतो. हा 'आळंदी' या रूढ नांवाशीं जुळता आहे. बाकीचीं नांवें मूळ नांवाचीं संस्कृत रूपें वाटतात.

वर उल्लेखिलेल्या अलका-माहात्म्यांत इंद्रायणीचा उल्लेख सर्वत्र ' कौबेराख्य महानदी ' असा केलेला आहे. या कुबेरगंगेच्या पात्रांत सिद्धसरोवर, चक्रतीर्थ, शालीतीर्थ, वायुतीर्थ, चंडिकातीर्थ अशीं अनेक तीर्थें असल्याचेंहि या बाळमुकुंदानें सांगितलें आहे. बाळमुकुंदाच्याच शब्दांत या जुनाट शिवपीठाची ख्याति सांगायची झाली तर —

नास्ति भूमण्डले क्षेत्र पवित्र पापनाशनम् ।
यत्र सिद्धेश्वरो देवो सिद्धाना सिद्धिदायकः ॥

[ जिथें सिद्धांना सिद्धि देणारा सिद्धेश्वर देव नांदतो आहे, त्या या क्षेत्रासारखें पवित्र आणि पापनाशक क्षेत्र सर्व भूमण्डळांत दुसरें नाहीं. ]

— आणि हें आजहि खरें आहे. ज्ञानेश्वर हेंहि एक सिद्धे-श्वर होते — शिवस्वरूप पावलेले सिद्ध पुरुष होते. त्यांच्या समाधीनें पुनीत झालेल्या या स्थानाहून अधिक पवित्र आणि पापनाशक स्थान भूमंडळावर दुसरें नाहीं.

महाविष्णूचा अवतार :

हा सर्व क्षेत्रमहिमा ध्यानीं आणून आपण इंद्रायणीस्नाना-साठीं जातों. कारण शुचिर्भूत झाल्याशिवाय मंदिरांत प्रवेश

करायचा नसतो. खरें दर्शन अन्तर्बाह्य शुद्धीशिवाय कसें घडणार ! अन्तःशुद्धि सन्तांच्या पुण्यस्मरणानें घडेल आणि बहिःशुद्धीसाठीं ही पुण्यपावन इंद्रायणी समोर वाहते आहे. हिच्याच तीरावर कुठें तरी एका समाजबहिष्कृत झोपडींत, सारा आसमंत अंधारानें ग्रासलेला असतांना, शके ११९३ च्या श्रावण वद्य अष्टमीच्या रात्रीं एक प्रकाशरेखा उदयास आली. आणि पांच हजार वर्षांनीं कृष्णजन्माची पुनरावृत्ति झाली. याच दिवशीं याच परिस्थितींत भगवान् कृष्णाचा जन्म झाला होता. माता-पिता कंसाच्या कारा-गारांत शृंखलाबद्ध होऊन पडलेलीं, वद्य पक्षांतील अष्टमीचा काळोख सर्वच दाटलेला आणि त्या काळोखाशीं प्रतिस्पर्धा कर-णारी जडता समाजमनांत गोठलेली – अशा परिस्थितींत भगवान् कृष्ण त्या कारागारांत मुक्तीचा महामंत्र घुमवीत जन्मास आला – त्यानें स्त्रीशूद्रांना उद्धाराचें आश्वासन दिलें, पतितांना परितापाची संधि दिली आणि दलितांचें उत्थान घडविलें. ज्ञानेश्वरांच्या जन्म-काळाची परिस्थितीहि अशीच होती.

द्विजीं वाळियेलें जगीं साडियेलें। शेखीं उपेक्षिलें आप्तवर्गीं।

असें ब्राह्मणांनीं वाळींत टाकलेलें, जगानें तिरस्कृत ठरविलेलें आणि आप्तेष्टांनीं उपेक्षिलेलें तें विठ्ठल-रुक्मिणीचें जोडपें एकाकी आणि असहाय परिस्थितींत जीवन कंठीत होतें. परमेश्वरावरचा विश्वास आणि सत्त्वगुणांची कांस धरून त्यांनीं आपला 'संन्याश्याचा संसार' तयानें भारून टाकला होता. जणुं त्या बहिष्कृत झोपडींत अवताराची पार्श्वभूमि तयार झाली होती. शेवटीं तो कृष्णजन्मोत्सवाचाच मुहूर्त साधून, स्त्री-शूद्रांच्या उद्धारासाठीं, रंजल्या-गांजलेल्यांना दिलासा देण्यासाठीं, मानवतेचीं महान् मूल्यें पुनश्च स्थिर करण्यासाठीं आणि अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठीं ज्ञानेश्वर जन्मले. त्या क्षणीं या इंद्रायणीच्या

तीरीं दुरिताचें तिमिर भीतीनें कंप पावलें असेल; कलीच्या काळजांत कल्पान्ताची कळ उठली असेल आणि जडाला चैतन्याची जखम झाली असेल. संतांनीं ज्ञानेश्वरांना 'महाविष्णूचा अवतार' मानले, तें यथायोग्य आहे.


– पण जन्मानंतरचा तो छळवाद कल्पनेंतहि असह्य होतो. ज्यांनीं सर्वांना आईची माया दिली, त्यांच्या पोरकेपणानें डोळे पाणावतात आणि जीव गलबलून जातो. अजून ज्यांना पंखहि फुटले नाहींत, अशा कोंवळ्या पिलांना घरट्यांत ठेवून आईनें चारा आणायला जावें आणि त्या कोंवळ्या जीवांना कायमचें अंतरावें – तशीच ती स्थिति. समाजाच्या हृदयशून्य नीतीनें या चार पोरांच्या मातापित्यांचा बळी घेतला. कधींहि न भेटणाऱ्या आईवडिलांची वाट न पाहणाऱ्या त्या वेड्या पोरांकडे पाहून क्षणैक काळाचेंहि हृदय फाटून गेलें असेल. मनांत येतें, यांचें छत्र हिरावून घेणाऱ्यांना हृदयच नव्हतें का ?

पण त्या महामानवाच्या मनांत अशी उद्वेगाची, कटुतेची छाया कधींहि तरळली नाहीं. बाळाची वाट पाहणाऱ्या आईच्या डोळ्यांत जें कांहींसें हळुवार असतें, त्याचाच प्रत्यय त्याच्या स्नेहाळ आलोकांत प्रत्येकाला येई. तो कारुण्यांत पावलें लपवीत आणि जीवातळीं जीव आंथरीत चालूं लागला कीं, त्याच्या स्नेहानें दिशा भारावत आणि वाटेवरील अणुरेणूंतून कृतार्थता ओसंडूं लागे.

त्याच्याच समाधिशिळेचें दर्शन आज आपल्याला घ्यायचें आहे – त्या पाषाणाच्या गर्भांत सामावलेल्या दिव्य जीवनाचा वेध घ्यायचा आहे.

हैबतरावबाबांची पायरी :

दर्शनासाठीं आपण आतां देऊळवाड्याकडे जाऊं या. या देऊळवाड्यास चहूं बाजूंनीं भव्य तट असून तीन दरवाजे आहेत.


हैबतरावबाबाची पायरी

महाद्वार उत्तरेला असून पूर्वेला गणेशद्वार आणि पश्चिमेला नदीकडे उतरण्यासाठीं पाणदरवाजा आहे. महाद्वाराच्या पायऱ्या चढून देऊळवाड्यांत प्रवेश करतांना हैबतरावबाबांची पायरी लागते. या पायरीवर बाबांची मूर्ति बसवलेली आहे. पंढरीची जशी नामदेव-पायरी, तशीच ही आळंदीची हैबतरावबाबांची पायरी. हैबतराव पवार हे मूळचे सातारा जिल्ह्यांतील आरफळ गांवचे देशमुख. ग्वाल्हेरला शिंद्यांच्या पदरीं ते मोठ्या हुद्द्यावर नोकरीला होते. तेथून एकदां बराच ऐवज बरोबर घेऊन आपल्या गांवीं येत असतांना त्यांना वाटेंत दरोडेखोरांनीं लुटलें आणि एका भुयारांत कोंडून ठेवलें.

या मरणप्राय संकटांत बाबांना ज्ञानेश्वरांच्या चरणांची आठवण आली. त्यांनीं हृदय पिळवटून माउलीचा धांवा केला. ज्ञानेश्वरांच्या कृपेनें एक इष्ट योग घडून आला. लौकरच दरोडेखोरांच्या टोळीच्या नायकाला मुलगा झाला आणि त्या आनंदाच्या आवेगांत त्यानें बाबांना सोडून दिलें.

परंतु या घटनेचा बाबांच्या हृदयावर विलक्षण परिणाम झाला. या व्यवस्थेच्या अंजनानें त्यांना परमार्थदृष्टीचा लाभ झाला. त्यांचे पाय घराची वाट सोडून आळंदीकडे वळले. आळंदीस

आल्यावर सिद्धबेटांत नामस्मरण व ज्ञानेश्वरीपारायण करून त्यांनीं एक तपाचा काळ एकान्तवासांत घालविला. त्यानंतर ते देऊळ-वाड्यांत ज्ञानेश्वरांच्या चरणांजवळ ( महाद्वाराच्या आंतील डाव्या बाजूच्या ओवरींत ) राहूं लागले. या चरणांचें वेड त्यांच्या मनाला इतकें लागलें कीं, त्यांनीं महाद्वाराच्या पायरींत चिरविश्रांति मागितली. शके १८३६ च्या कार्तिक वद्य अष्टमीस बाबांनीं ज्ञानेश्वरांच्या चरणांशीं कायमचा विसांवा घेतला आणि त्यांच्या अंतिम इच्छेनुसार याच पायरीखालीं त्यांचा देह गांवकऱ्यांनीं विसर्जित केला. संतचरणांची धूळ सतत आपल्या शिरीं पडावी, ही बाबांची आंतरिक इच्छा.

नामा म्हणे आम्हीं पायरीचे चिरे ।
संत पाय हिरे देती वरी ॥

आषाढी यात्रेंतील आळंदीच्या पालखीचा विराट सोहळा बाबांनींच सुरू केला. ही आळंदीपासून पंढरीपर्यंत प्रतिवर्षीं वाह-णारी चढतीवाढती भक्तिगंगा म्हणजे बाबांच्या ज्ञानेश्वरभक्तीचें एक जागतें स्मारक आहे. या पायरीवर विनम्रपणें माथा टेकवून आपण पुढें जाऊं या.

## आतां ऐसें कोणी होणें नाहीं :

हैबतरावबाबांची पायरी चढून महाद्वारानें देऊळवाड्यांत प्रवेश करतांच उजव्या बाजूस मारुती व डाव्या बाजूस गरुड यांचीं लहानशीं मंदिरें आहेत. दरवाज्यासमोर फरशीचें लहान पटांगण आहे. हें पटांगण ओलांडून गेल्यावर मुख्य सभामंडप लागतो. या मंडपाला ‘ भजनी मंडप ’ असेंहि म्हणतात. या भजनी मंडपाच्या उजव्या व डाव्या बाजूंना सारख्याच आकाराचे दोन मंडप आहेत. उजव्या बाजूच्या मंडपांत विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ति आहेत.

भजनी मंडपाच्या पुढें कासव मंडप आहे आणि कासव मंडपाच्याहि पुढें एक मंडप आहे. या लहान मंडपानंतर समाधीचा गाभारा लागतो. या गाभाऱ्यांतच ज्ञानेश्वरांच्या चरणांचें दर्शन आपल्याला घ्यायचें आहे. प्रथम समाधीच्या शिलावेदीवर मस्तक टेकवून नंतर समाधीमागच्या विठ्ठल-रुक्मिणीचें दर्शन घ्यायचें आहे. आधीं भक्त आणि नंतर देव. भक्त नसते तर देवाच्या अस्तित्वाचें सगुण साकार प्रत्यंतर आम्हां पामरांना घडलेंच नसतें. भक्तांच्या अनुभूतीच्या मुशींतूनच सगुण परमात्म्याचा प्रसव झाला आहे.

गाभाऱ्याला पूर्वेच्या बाजूस एक लहानशी खिडकी आहे. या खिडकीचा उपयोग यात्रेच्या वेळीं दर्शनेच्छू स्त्रियांसाठीं होतो. गाभाऱ्यालगतच्या मंडपाला पूर्व व पश्चिम दिशांना दोन दारें आहेत.

गाभाऱ्याच्या दाराशीं येतांच मनांत अनेक भावतरंगांची दाटी होते. थोडें कारुण्य, थोडा आनंद, थोडें आश्चर्य आणि अपार भक्तिभाव यांचें संमिश्रण मनांत उसळूं लागतें. पाहतां पाहतां वर्तमानाचा विसर पडतो आणि समाधिशिळेच्या स्पर्शानें सातशें वर्षांपूर्वीचा तो करुणगंभीर प्रसंग आंतल्या डोळ्यांपुढें नाचूं लागतो.

शके १२१८ मधील कार्तिक वद्य त्रयोदशीचा दिवस. त्या दिवशीं याच ठिकाणीं मरणाचेंहि मरण पाहणारा एक अलौकिक प्रसंग घडून आला. जीवनांत कृतार्थ झालेल्या ज्ञानेश्वरांनीं जिवंत समाधि घेण्याचा निश्चय प्रकट केला. भोंवतीं नामदेव, गोरा कुंभार, चोखामेळा, जनाबाई आदि संतसांगाती विकल हृदयानें जमलेले आहेत आणि हा आनंदाचा कंद मुखावर संतृप्तीचें हास्य फुलवीत निरोपासाठीं सज्ज झाला आहे.

पांडुरंगाला नमन करून ज्ञानेशांनीं गुरुदेव निवृत्तिनाथांचे पाय धरले :

पाळिलें पोसिलें चालविला लळा । बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ॥
स्वामिचिया योगें झालों स्वरूपाकार । उतरलों पार मायानदी ॥

निवृत्तिनाथांनीं ज्ञानेशांना मिठी मारली आणि भावी ताटा-तुटीच्या कल्पनेनें साऱ्या संतांच्या डोळ्यांतून आसवांची इंद्रायणी वाहूं लागली. स्थितप्रज्ञ निवृत्तींचें हृदय विव्हळ झालें.

ज्येष्ठाचिये आधीं कनिष्ठानें जाणें । वळंचणीचें पाणी आढ्या गेलें ॥

या विपरीत नियतीनें त्याची विकलता कमालीची वाढली आणि संयमाच्या बंधाऱ्यांना न जुमानतां शोकाचा महापूर वाहूं लागला—

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । बोध बारा वाट वाहताती ॥

असें नामदेवानें निवृत्तिनाथांच्या शोकाकुलतेचें वर्णन केलें आहे. सोपान आणि मुक्ताईची स्थिति तर वर्णनातीत असह्य झाली. त्यांचें हें दुसऱ्या वेळचें आणि अखेरचें पोरकेपण कल्पनेलाहि सहन होत नाहीं.

आम्हां माता पिता नित्य ज्ञानेश्वर । नाहीं आतां थार विश्रांतीसी ॥

अशी त्यांची असहाय स्थिति झाली. परंतु त्या निश्चयाच्या महामेरूनें सुख-दुःखांवर केव्हांच मात केली होती. सिद्धेश्वरासमोरचा शुभ्र नंदी दूर सारून ज्ञानेश्वर समाधि-स्थळाच्या गर्भागारांत प्रवेशले आणि शिवस्वरूप पूर्णता साधण्यासाठीं आसनस्थ झाले. जणुं हृदयाच्या गर्भागारांत, आत्मज्योतीच्या प्रकाशांत शिवदर्शन घेऊं पाहणारी उत्कंठाच आसनस्थ झाली. क्षणांचीं कांहीं पांखरें मनोवेगानें भिरभिरत गेलीं आणि पाहतां पाहतां सिद्धीच्या अंतिम क्षणाचा राजहंस ज्ञानेशांच्या पदकमळांवर विसांवला.

अमृताची पहांट धवळली. हृदयपुष्करांतून प्रकाशजळाची झरी वाहूं लागली. आत्मा आनंदाच्या दोंदावर लोळूं लागला. ज्ञानेशांच्या नेत्रकळिकांत आकाश लपंथपी खेळूं लागलें. आधींच

कांतिमान् असलेल्या त्यांच्या देहांत आगळेंच सौंदर्य संचारलें. संध्येचा लालस लालिमा मुसावल्यासारखें तें रूप – नितळपणांत सोनचांफ्याचा कळा नि मोहकतेंत अमृताचा पुतळा. जणुं स्फटिकांत चैतन्य संचारलें आहे – जणुं रत्नबीजाला तेजाचे कोंभ फुटले आहेत. मोत्यांची पक्वता दाटल्यामुळें शिंपल्याची शिवणी जशी उतटते, तशी पापण्यांच्या कवळींतून झेपावणारी दृष्टि गगनाला गवसणी घालीत आहे. साधनेच्या वेदीवर तेज आणि शांति यांचें स्वयंवर झालें आहे.

निवृत्तिनाथांनीं स्वहस्तें समाधिद्वाराला शिळा लावली आणि जणुं ती शिळा स्वतःच्या हृदयावरच आदळल्याप्रमाणें सारा भक्तगण भग्नहृदय झाला.

कळवळ्याची कींव येवों द्यावी :

आठवणींचा चित्रपट येथपर्यंत आला कीं मनाची तंद्री तुटते आणि तें पुनः वर्तमानांतल्या समाधिशिळेसमोर उभें ठाकतें. ज्ञानेश्वरांच्या थोरवीनें मनाचा कानाकोपरा दरवळून जातो. ज्ञानेश्वरांचा जीवनकाळ केवळ एकवीस वर्षांचा. पण हा महामानव एवढ्या अल्पकाळांत सारें कांहीं आटोपून कृतार्थ हृदयानें निघून गेला. मानवी मोजमापानें त्यांच्या मनाचें नि जीवनाचें क्षेत्रफळ मोजणार तरी कसें ! दाही दिशांनीं आकाशाला मिठी देण्यासाठीं भुजा पसराव्या, तसें चराचर विश्व त्यांच्या अनुभूतीच्या कवेंत सामावलें होतें. त्यांचें व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रेम, प्रज्ञा आणि प्रतिभा यांचें प्रयागतीर्थ. त्यांच्या प्रेमानें चराचराला धवळलें होतें, प्रज्ञेनें सर्वज्ञतेला कवळलें होतें आणि प्रतिभेनें विधात्यालाहि लाजविलें होतें. जणुं पूर्णतेच्या प्रवासांतील अखेरचें पाऊल टाकण्यासाठींच त्यांचा हा जन्म होता.

ज्ञानेश्वरांच्या अवतरणापूर्वी महाराष्ट्र जडमूढ होऊन पडला होता. ज्ञानेश्वरांनी जाणिवेच्या मंदिरांत जीवनाची भूपाळी गायली आणि सह्याद्रीची आत्मशक्ति जागवली. त्यांच्या आश्वासक हांकेला साद देण्यासाठीं अस्थींतून दधीचि जागे झाले आणि रक्षेंतून ' कलिकाळाचा माथा फोडणारे ' फिनिक्स पक्षी झेपावले. त्यांच्या स्पर्शानें जणुं महाराष्ट्रांतील शिळांतून चित्कळा फुलल्या, मातींतून शांति अंकुरली आणि तृणपर्णांतून वज्रशक्ति पालवली. त्यांच्या मृत्युंजयी प्रेरणेनें दासी जनीनें भक्तीचीं उपनिषदें गायिलीं आणि चोख्यानें हृदयाच्या चोखपणाचें महिमान उद्घोषिलें.

असा हा ज्ञानाचा ईश्वर आणि स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्ती दृष्टीआड होतांना नामदेवाच्या हृदयाची कासाविशी किती झाली असेल ? ' स्त्रीजन्म म्हणूनी न व्हावें उदास ' असा आत्मविश्वास जागविणारी ज्ञानाबाई कायमची अंतरतांना भाव-वेड्या जनीच्या मनाची स्थिति किती केविलवाणी झाली असेल ?—

ज्ञानाबाई आई आर्त माझे पायीं । धावुनीया येई झडकरी ॥
बहु कासावीस होतो माझा जीव । कळवळ्याची कींव येवों द्यावी ।
नामयाची जनी म्हणावी आपुली । तुम्ही आपंगिली मायबापा ॥

आपलेंहि मन असेंच विरहानें वेडें होतें — त्या हरपल्या श्रेयाचा शोध घेत इंद्रायणीच्या परिसरांत भटकूं लागतें. वाटतें, ज्ञानेशांचें सगुण साकार रूपडें साक्षात् प्रकटावें आणि आपलें इवलेंसें हृदय चौफाळून त्याची इवलीशी पूजा बांधावी. ही आपल्या खुळ्या मनाची खुळी आशा कधीं पुरी होईल का ? तो निराकारांत समरसलेला विराट् आत्मा क्षणैक नक्षत्रांचा डाव आवरून आणि चंद्रसूर्यांची चेंडूफळी थांबवून आपल्या आर्त हांकेला साद देईल का ? त्यानें एकदांच ... फक्त एकदांच सगुण रूपानें प्रकटावें आणि आनंदसरोवरांत आंदोळणाऱ्या कमळांसारख्या डोळ्यांतून


आपल्यावर कृपेची अमृतवृष्टि करावी. त्याशिवाय आपल्या जीवनांतील हें जडमूढपण नाहींसें होणार नाहीं.

**समाधीचा परिसर आणि परिवार :**

गाभाऱ्यालगतच्या सभामंडपाच्या पूर्वेस गणेश-मंदिर आणि पश्चिमेस सिद्धेश्वर-मंदिर आहे. हीं दोन्ही मंदिरें पुरातन आहेत.

पूर्व पश्चिम देवस्थान । मध्यें ज्ञानाबाई आपण ॥

असें या दोन्ही मंदिरांचें स्थान एकनाथांनीं वर्णिलें आहे. गाभाऱ्यालगतच्या सभामंडपांतून पूर्वद्वारानें बाहेर पडल्यावर एक हेमाडपंती बांधणीचा सोळखांबी मंडप लागतो. या मंडपांत गणपतीची पुरातन मूर्ति आहे. याचे गाभारा, मंडप व नंदी असे तीन भाग आहेत. गाभाऱ्यांत शंकराची स्वयंभू पिंडी आहे. आळंदीचें ज्ञानेश्वरांच्यापूर्वीचें जुनाट शिवस्थान तें हेंच. याच शिवापुढच्या नंदीखालच्या मार्गानें ज्ञानेश्वर समाधिस्थळाकडे गेले, असें मानतात. या शिवाच्या साक्षीनेंच ज्ञानेश्वरांनीं मुक्तीचें पाणिग्रहण केलें होतें.




सिद्धेश्वरापुढील नंदी ( समाधीचे मूलद्वार )

उठयिला नंदी
शिवाचा ढवळा ।
उघडिली शिळा
विवराची ॥

असा उल्लेख नामदेवानें केला आहे.

समाधीच्या अगदीं पाठीमागें प्रदक्षिणेच्या वाटेवरच मुक्ताबाईच्या मंदिरासमोरील मंडप आहे व त्याच्या दक्षिणेस मुक्ताबाईचें छोटेसें मंदिर आहे. म्हणजे पूर्वेकडून समाधीची प्रदक्षिणा करूं लागल्यावर क्रमानें गणपति, मुक्ताबाई व सिद्धेश्वर अशीं मंदिरें लागतात. मुक्ताबाईनें समाधि घेतली ती दूर तापीतीरावरच्या एदलाबाद गांवीं; परंतु ज्ञानेश्वरांवरील तिच्या निरतिशय प्रेमामुळें कुणा सहृदय भक्तानें तिची इथें भावाच्या समाधीजवळ स्थापना केली आहे. ज्ञान आणि मुक्ति यांचें ऐक्य कल्पिणारा आणि ज्ञानापाठीं मुक्ति सदैव असतेच, असें सूचित करणारा हा भाविक मोठा कल्पक आणि भावनाशील असला पाहिजे.

श्रीसिद्धेश्वराचें दर्शन घेऊन पुढें गेल्यावर अजानवृक्ष लागतो. म्हणजे हा अजानवृक्ष कासव मंडपाच्या उजव्या अंगास आहे. ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतल्यानंतर श्रीनिवृत्तिनाथांनीं रक्षणार्थ जो कोरडा दंड समाधिस्थानासमोर रोवला, तोच क्षणांत पालवून त्याचा वृक्ष बनला, अशी जनश्रुति या वृक्षामागें आहे. या दंतकथेंत स्वारस्य असो-नसो, पण ज्ञानेश्वरांच्या स्पर्शानें, काष्ठवत् झालेल्या मराठी जीवनाच्या वृक्षाला नवी पालवी फुटली आणि तो फळीं-फुलीं बहरला, एवढें



मुक्ताबाईचें मंदिर


मात्र खरें. या चमत्काराची ग्वाही इतिहास कंठरवानें देत आहे. हा अजानवृक्ष जणुं त्या इतिहासाचें प्रतीक होऊन उभा आहे.

पुढें तीनशें वर्षांनीं एकनाथांना एक स्वप्नदृष्टान्त झाला —

श्रीज्ञानदेवें येऊनि स्वप्नात । सांगितली मात मजलागीं ॥
दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा । परब्रह्म वेगळा बोलतसे ॥
अजानवृक्षाची मुळी कंठास लागली । येऊनि आळंदीस्थळीं काढ वेगीं ॥

या दृष्टान्तानुसार नाथ आळंदीस आले आणि त्यांनीं या वृक्षाच्या मुळांचा समाधीला होणारा त्रास दूर केला.

या जनश्रुतींत किंवा श्रद्धेंत एक वेगळेंच रहस्य सांठविलें आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर लौकरच परचक्रामुळें यादवांचें राज्य नष्ट झालें आणि सारा महाराष्ट्र अस्मानी-सुलतानी संकटांनीं ग्रासून टाकला. भाषा आणि संस्कृति मुसलमानी वर्चस्वाखालीं दडपली जाऊं लागली. येथील क्षत्रियांनीं मुसलमानी राज्यकर्त्यांची सत्ता बळकट करण्यासाठीं हात दिला आणि ब्राह्मणांनीं त्यांची दफ्तरदारारी पत्करून व प्रसंगीं शस्त्र-स्वीकार करून स्वधर्मावर निखारा ठेवण्यासहि कमी केलें नाहीं. ज्ञानेश्वरांचा संदेश या अंधारयुगांत जवळ जवळ लुप्त झाल्यासारखा झाला. ज्ञानेश्वरी — अध्ययनाची




अजान-वृक्ष

परंपराच नष्ट होण्याची वेळ आली. ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत मिळणेंहि दुरापास्त झालें. जणुं 'अज्ञानवृक्षा'च्या मुळ्यांनीं ज्ञानेश्वरांची प्रभावी वाणीच रुद्ध केली. ही अज्ञानवृक्षाची मुळी खुडून ज्ञानेश्वरांचा कंठ मोकळा करण्याची महान् ऐतिहासिक कामगिरी एकनाथांनीं शके १५०६ मध्यें पार पाडली. अपपाठांनीं अशुद्ध बनलेल्या ज्ञानेश्वरीची त्यांनीं शुद्ध प्रत तयार केली आणि ज्ञानेश्वरीवर प्रवचनें करून ज्ञानेश्वरांचा संदेश पुनः महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत घुमविला. नाथांच्या या कार्यामुळेंच वारकरी त्यांना 'ज्ञानाचा एका' म्हणतात. नाथांचें भागवत म्हणजे ज्ञानेश्वरीचें अनुभवाधिष्ठित स्पष्टीकरण आहे. हें पाहिलें कीं, या अजानवृक्षाच्या छायेंत इतिहासांतील ते सुवर्णक्षण मनश्चक्षूंना भुरळ पाडूं लागतात. या वृक्षाच्या छायेंत ज्ञानेश्वरीचें पारायण करीत बसलेले अनेक साधक पाहिले कीं आपल्याहि मनांत येतें कीं, येथें तप आचरून अज्ञान निरसावें आणि ज्ञानेश्वरांच्या कृपेनें ज्ञानाची कास धरावी.

अजानवृक्षाखालचें हें ज्ञान-चिंतन संपवून पुढें गेल्यावर सुवर्णपिंपळ आहे.

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ। अगीं ऐसें बळ रेडा बोले॥

असा या पिंपळाचा साभिमान उल्लेख तुकोबांनीं केला आहे. विठ्ठलपंतांनीं संन्यास घेतल्यावर त्यांच्या पत्नीनें – रुक्मिणीनें – याच पिंपळाची दीर्घकाल उपासना केली होती. विठ्ठलपंतांचे गुरु तीर्थयात्रा करीत आळंदीस आले असतांना याच पिंपळाच्या पारावर विसांवले होते आणि येथेंच त्यांनीं रुक्मिणीला 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला होता. या आशीर्वादानेंच विठ्ठलपंतांना पुन्हां गृहस्थधर्मांत खेचून आणलें आणि महाराष्ट्राला भूषणभूत ठरलेल्या निवृत्ति-ज्ञानदेवादि नररत्नांना जन्म दिला. असा हा




सुवर्ण-पिंपळ

भाग्यशाली अ
शुभंकर वृक्ष आहे. सुवर्ण पिंपळाच्य साक्षीनें महाराष्ट्राच्य सांस्कृतिक इतिहासांतील सुवर्णयुग घडलें आहे. त्याच्या पानापानांत त्या सुवर्णयुगाची सोनेरी गौरवगाथा लिहिलेली आहे. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक लोकशाहीचा प्रवर्तक याच सुवर्णपिंपळाच्या छायेखालीं चिरकाल विसांवला आहे.

सुवर्ण-पिंपळावरून पुढें आपण परत भजनी मंडपाच्या डाव्या बाजूला गेलों म्हणजे एक पार लागतो. या पाराला ‘ नाथांचा पार ’ असें म्हणतात. या पाराजवळच आंतील बाजूस ज्ञानेश्वरांच्या नाथपंथी परंपरेंतील केसरीनाथांची समाधि आहे. त्यांची परंपरा आदिनाथ – मत्स्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – ज्ञाननाथ – ( ज्ञानेश्वर ) – सत्यामलनाथ – गैबीनाथ – गुप्तनाथ – उद्बोधनाथ – केसरीनाथ अशी आहे. त्र्यंबकेश्वराच्या परिसरांत ब्रह्मगिरीवर निवृत्तिनाथांना गहिनीनाथांनीं नाथपंथाच्या विश्वशुभंकर तत्त्वज्ञानाचा आणि अद्वयानंदवैभवाचा जो चिरंतन ठेवा दिला, तोच ज्ञानेश्वरांनीं आपल्या वाणींतून साऱ्या महाष्ट्राच्या स्वाधीन केला. ज्ञानेश्वरांनीं पुढें वारकरी आणि नाथ दोन्ही परंपरा चालू केल्या.

१५०५३

केसरीनाथ (मूळचे केशवपंत) हे राशिन येथें मामलतीच्या हुद्द्यावर होते. नोकरींत कांहीं दोषारोप आल्यामुळें त्यांना विरक्ति प्राप्त झाली. राशिन येथें उद्बोधनाथांचीं कीर्तनें आणि ज्ञानेश्वरी-वरील प्रवचनें ऐकून त्यांची परमार्थाची ओढ वळावली आणि त्यांनीं उद्बोधनाथांचा गुरुमंत्र घेतला. पुढें केसरीनाथांनीं आपल्या गुरुच्या पुत्रालाच दीक्षा दिली. हे गुरुपुत्र मल्हारीनाथ राशिन मठाची परंपरा चालवीत राहिले. केसरीनाथांचे दुसरे प्रसिद्ध शिष्य म्हणजे पैठणचे शिवदीननाथ. शिवदीननाथ हे ज्ञानेश्वरांच्या नाथपंथी परं-परेंतील एक चिरस्मरणीय पुरुष होत. एवढ्या थोर शिष्याचें गुरुत्व पत्करून केसरीनाथ धन्य झाले. पैठनास असतांना केसरीनाथांना आपल्या परंपरेचें माहेर असलेल्या आळंदीच्या महिमानाची जाणीव उत्कटपणें झाली आणि ते आळंदीस आले. अखेर आळंदीसच ज्ञानेश्वरांच्या पुण्यपावन चरणांजवळ शके १६४६ मध्यें मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेला त्यांनीं समाधि घेतली. त्यांचीं अनेक पदें आणि 'सिद्धान्तसार' (रचना : शके १६३८) हा ग्रंथ प्रकाशनाची वाट पाहत हस्तलिखित जीर्ण बाडांत पडून आहे.



नाथांचा पार

केसरीनाथांचें एक शिष्य लक्ष्मीनाथ यांची समाधि गुरूच्या समाधीच्या पुढेंच आहे. नाथांच्या पाराजवळ ज्ञानेश्वर-समकालीन भोजलिंगकाका नांवाच्या एका सत्त्वशील सत्पुरुषाची समाधि आहे. या पुरुषानें ज्ञानेश्वरादि भावडांना सहानुभवानें सांभाळलें आणि ज्ञानेश्वरांच्या निर्याणापूर्वींच संतोषानें इहलोक सोडला असें सांगतात.

देऊळवाड्याची उभारणी.

ज्ञानेश्वरांनीं आपल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें, वैश्विक प्रेमानें आणि अमृतमधुर वाणीनें वारकरी संप्रदायाला तात्त्विक बैठक दिली आणि वारकरी संप्रदायाच्या पताकेखालीं सर्व जाती-जमातींना उद्धाराचा मूलमंत्र दिला त्यामुळें स्वाभाविकच पंढरीच्या खालोखाल आळंदीचें महिमान वाढलें. 'आषाढी-कार्तिकी'ची महती भाविकांच्या मनांत सारख्याच प्रमाणांत निर्माण झाली.

परंतु ज्ञानेश्वरांच्या निर्याणानंतर महाराष्ट्रांत जें अंधारयुग निर्माण झालें त्या काळांत आळंदीची स्थिति काय होती, हें सांगण्याचें साधनच उपलब्ध नाहीं. हरिहरेंद्रस्वामींच्या समाधीच्या जीर्णोद्धाराच्या वेळीं ज्या तीन समाधि सांपडल्या, त्यांतील एकी-वर शके '११३१ चैत्र वद्य १० भोमवासर' अशी मिति आहे. याचा अर्थ असा कीं, आळंदी हें गांव ज्ञानेश्वरांच्या पूर्वींपासून संत-निवासानें पुनीत झालेलें आहे. अर्थातच ज्ञानेश्वरांच्या समाधी-नंतर त्यांचें संस्मरण जागें ठेवण्यासाठीं भक्त-भाविकांनीं कांहीं वास्तूंची उभारणी निश्चित केलेली असणार.

हल्लींचें समाधि-मंदिर इ. स. १५७० मध्यें पुरंदर येथील आंबेकर देशपांड्यांनीं बांधलें. म्हणजे संत एकनाथांनीं आळंदीस येऊन समाधीच्या गळ्याला लागलेली अजानवृक्षाची मुळी काढून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत ज्या वर्षीं तयार केली, त्याच्या अगोदर

फक्त चौदाच वर्षें या समाधि-मंदिराची उभारणी झालेली आहे.

शके १५९३ (इ. स. १६७१) मध्यें शिवछत्रपतींनीं समाधीकडे चालू असलेल्या उत्पन्नासंबंधीं दिलेली सनद उपलब्ध आहे. आळंदी पुण्यापासून जवळ असल्यामुळें पेशव्यांचें लक्ष स्वाभाविकच आळंदीकडे विशेष असे. पेशवे आळंदीच्या यात्रेस जात असत आणि यात्रेच्या व्यवस्थेसाठीं संरक्षकहि पाठवीत असत.

समाधि-मंदिराच्या उभारणीनंतर पांच वर्षांनीं (इ. स. १५७५) आंबेकर देशपांड्यांनींच पूर्वेकडील दरवाजा, भिंती व ओवऱ्या बांधल्या. गरुडपाराच्या मागें असलेली दीपमाळ दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांची पत्नी लक्ष्मीबाई हिनें शके १६६५ मध्यें बांधल्याचा निर्देश दीपमाळेवरील शिलालेखांत आहे. भजनी मंडपाचें भव्य आणि सुंदर बांधकाम शिंद्यांचे दिवाण रामचंद्र मल्हार शेणवी यांनीं शके १६८२ मध्यें करविलें. या मंडपाच्या डाव्या बाजूचा मंडप अप्पासाहेब नागपूरकर यांनीं इ. स. १९०७ सालीं बांधला. कासव मंडप इ. स. १७९९ मध्यें बाजीरावाचे कारभारी अंताजी माणकेश्वर यांनीं बांधला होता. परंतु तो मोडकळीस आल्यामुळें हल्लींचा कासव मंडप ज्ञानेश्वर संस्थान कमिटीनें इ. स. १९२५ मध्यें बांधला. समाधि-मंदिराच्या कळसाचें काम इ. स. १८७२ मध्यें पुण्याच्या नंदराम गवंड्यांनीं केलें. भोजलिंगकाका, लक्ष्मीनाथ, केसरीनाथ या समाधि असलेला भाग केसरीनाथांचे पैठणचे शिष्य शिवदीननाथ यांनीं शके १६४७ मध्यें बांधला. मुक्ताबाईचें मंदिर इ. स. १८८१ मध्यें नरसिंहसरस्वतींनीं बांधलें. महाद्वार, त्याच्या दोन्ही बाजूंचा तट व ओवऱ्या काशीराव शिंदे यांनीं बांधल्या; त्यामुळें महाद्वाराला 'शिंदे दरवाजा' असेंहि म्हणतात. महाद्वारावरील नगारखाना

बाळाजी गोविंद यांनीं इ. स. १८०० मध्यें बांधला. पूर्व दरवाजावरील नगारखाना निजामाचे दिवाण चंदूलाल यांनीं बांधला. पश्चिमद्वार ( पाणदरवाजा ), तिकडील भिंत व ओवऱ्या बाळाजी बाजीरावांनीं इ. स. १७५० मध्यें बांधल्या. या दरवाजावरील नगारखाना दुसरे सयाजीराव गायकवाड यांनीं इ. स. १८४० मध्यें बांधला.

देऊळवाड्याच्या उभारणीचा हा इतिहास पाहिला म्हणजे एक गोष्ट सहज स्पष्ट होते कीं, आळंदीच्या या देऊळवाड्याच्या उभारणींत मराठे राज्यकर्त्यांचा – विशेषतः पेशवे आणि त्यांच्या आधिपत्याखालील सरदारांचा – उत्साहपूर्वक प्रयत्न होता. या उत्तरकालीन मराठे राज्यकर्त्यांनीं बहुतेक सर्वच क्षेत्रांतील मंदिरांच्या उभारणीचा आणि जीर्णोद्धाराचा मोठा प्रयत्न केला. या प्रयत्नांत मराठी भागवत परंपरेच्या या महान् उद्धारकाच्या समाधिस्थानाला श्रेष्ठ स्थान मिळावें, हें स्वाभाविकच होतें.

नित्य-नैमित्तिक उपासना :

पेशव्यांनीं समाधीच्या नित्य-नैमित्तिक उपासनेचें अंदाजपत्रक करून जमाखर्चाची व्यवस्था केली होती. पुढें इंग्रजांच्या अमदानींत सन १८५२ मध्यें देवस्थानाची व्यवस्था पाहण्यासाठीं ‘ आळंदी संस्थान कमिटी ’ निर्माण झाली. या कमिटीतर्फे नित्य-नैमित्तिक उपासना, देऊळवाड्यांतील जीर्ण वास्तूंचा पुनरुद्धार, परिसराची शोभा आणि स्वच्छता इत्यादि कामें तत्परतेनें होत राहिलीं.

देऊळवाड्यांतील नित्योपासना पहाटे ४ वाजल्यापासून रात्रीं ११ वाजेपर्यंत चालते. त्यासाठीं कमिटीनें खास पुजाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. पुजारी पहाटे चार वाजतां समाधीमागील

विठ्ठल-रुक्मिणीची आणि समाधीची पादप्रक्षालनपूर्वक पूजा करून काकडआरती करतात. नंतर ५ च्या सुमारास वेदांतील पवमान-सूक्तानें अभिषेक करून त्यांची षोडषोपचारें पूजा करतात. नंतर विठ्ठल-रुक्मिणी व ज्ञानेश्वर यांना पोषाख चढवून समाधीवर चांदीचा मुखवटा ठेवतात. पूजा-पोशाख झाल्यावर दुधारती होते. दुधारतीच्या वेळीं गांवांतील बरेच स्त्री-पुरुष उपस्थित राहतात. दुधारतीनंतर महाराजांचा पोशाख उतरवून केवळ मेखळा ठेवतात. सकाळीं ७ ते १२ पर्यंत भक्त-भाविकांना स्वहस्तें पूजा करण्याची मोकळीक असते. समाधीच्या सकाळच्या महापूजेच्या वेळींच देऊळवाड्यांतील इतर देवतांचीहि पूजा होते. दुपारीं १२ च्या सुमारास महानैवेद्य होतो पुनः दुपारीं ४ च्या सुमारास महाराजांना पोशाख चढवितात. रात्रीं ८ वाजतां गांवांतील भाविकांच्या उपस्थितींत धुपारती होते आणि ११ वाजतां शेजारती झाल्यावर देऊळवाड्याचे सर्व दरवाजे पहाटे ४ पर्यंत बंद राहतात. भजनी मंडपांत समाधीपुढें रात्रंदिवस अखंड वीणा छेडली जाते.

या नित्योपासनेशिवाय वर्षप्रतिपदा, रामनवमी, हनुमान-जयन्ती, गणेशजयन्ती, महाशिवरात्र, मुक्ताबाईची पुण्यतिथि इत्यादि नैमित्तिक उत्सव देऊळवाड्यांत साजरे होतात. परंतु आळंदीच्या परिसरांतील अणुरेणु ज्या दिवशीं भक्तिगजरानें निनादून जातो, तो म्हणजे ज्ञानेश्वरांच्या पुण्यस्मरणाचा दिवस — कार्तिक वद्य त्रयोदशी कार्तिक वद्य षष्ठीपासून अमावस्येपर्यंत हा महोत्सव आळंदीस गाजत राहतो. 'ज्ञानोबा माउली 'च्या नांवाचा जयजयकार देऊळवाड्यांत घुमत राहतो. एकादशीपासून त्रयोदशीपर्यंत लाख-दोन लाख वारकरी माउलीच्या दर्शनासाठीं इंद्रायणीकांठीं गर्दी करतात — भक्तीच्या मस्तींत दुःखांना विसर पाडतात आणि माउलीच्या पायाच्या स्पर्शानें हृदयांतील सद्भावांना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible] ५५८५५ [illegible]

जाग आणतात. या प्रसंगीं जणुं प्रत्येक भाविक हृदय माउलीला विनवीत असतें —

> तुझ्या दिव्य दर्शनानें आत उजळावी ज्योत,
> व्हावें जीवन आरती प्रभो, तुझ्या पूजनांत ?

पंढरपुरा नेईन गुढी :

सिद्ध पुरुषानें आपलें महिमान वाढवूं न देतां, अलौकिक आचारांच्या आणि चमत्कारांच्या छंदांत न फसतां समाजाला आपलेंसें करून पुढें न्यायचें असतें. परंतु लोकमानस असें विलक्षण आहे कीं, त्याला कुणा व्यक्तीच्या ठिकाणीं दिव्यतेचें दर्शन झालें कीं, तें विभूतिपूजा सुरू करतें आणि त्या विभूतीनें ज्या तत्त्वांसाठीं काया-वाचा-मन शिणविलें, त्या तत्त्वांचा लोकमानसाला विसर पडतो. ही विभूतिपूजेची उपाधि वाढण्याची शंकाहि ज्ञानेश्वरांच्या अकाल-समाधीमागें असल्याचें नामदेवांनीं सांगितलें आहे.

> मार्गीचारें वर्तावें । विश्व मोहरें लावावें ॥
> अलौकिक नोहावें । लोकाप्रती ॥

असें पथ्य ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्या ध्रुवताऱ्याकडे दृष्टि ठेवण्यास सर्वांना प्रवृत्त केलें, त्याचें प्रतीक पंढरीस नांदत आहे.

> माझें जीवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ॥

असें आपलें हार्द त्यांनीं व्यक्त केलें आहे. हें त्यांचें हार्द महाराष्ट्रांतील सहस्रावधि वारकऱ्यांच्या स्मरणांत जागें आहे. प्रतिवर्षीं आषाढी एकादशीच्या निमित्तानें ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीस नेण्यासाठीं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून वारकरी आळंदीस लोटतात. पालखीच्या प्रस्थानाचा दिवस, जाण्याचा मार्ग, मुक्कामाचीं ठिकाणें आणि प्रवासांतील सोयी या

सर्व गोष्टींची स्पष्ट कल्पना कुठल्याहि मार्गदर्शक पुस्तिकेवांचून सर्व भोळ्याभाबड्यांनाहि स्वच्छ प्रकारें असते. सर्व कार्यक्रम अत्यंत आंखीव-रेखीव पद्धतीनें परंतु अकृत्रिम उत्कटपणानें पार पडतात. त्यांत यंत्रवत् सुरळीतपणा असेल, पण निर्जीव यांत्रिकता नसते. सर्वच वातावरण भक्तीच्या मस्तीनें भारावलेलें असतें; त्यामुळें सोयी-गैरसोयींचा आणि अडीअडचणींचा विचारच कुणाच्या मनाला शिवत नाहीं. त्या वातावरणांत 'सर्व सुखाचें माहेर' असलेला तो कृपाघन पांडुरंग सर्वांच्याच हृदयांत विराजत असल्यामुळें—

एकमेका साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ॥

असा उत्कट सहकार सहजच नांदत असतो.

माउलीच्या बरोबर पंढरीला जाण्यांत वारकऱ्यांना अत्यंत धन्यता वाटते. कारण याच माउलीनें कनवाळूपणानें त्यांना सुखाचा मूलमंत्र शिकविला आहे. ज्येष्ठ वद्य अष्टमीस पालखीचें प्रस्थान ठेवलें जातें. प्रस्थापूर्वींच दोन-चार दिवस आळंदीचा परिसर दिंड्या-पताकांच्या भारानें शोभूं लागतो. टाळ-चिपळ्यांचा नाद कानांवर येऊं लागतो. 'श्रीज्ञानदेव तुकाराम' हा गजर सुरू होतो. उजव्या हातीं भगवी पताका, डाव्या हातीं चिपळ्या, गळ्यांत तुळशीच्या माळा, पाठीशीं 'ज्ञानेश्वरी'ची शिदोरी आणि मुखीं हरिनामाचा घोष – अशा वेशांतील वारकऱ्यांचे थवेच्या थवे इंद्रायणीच्या कांठीं जमा होतात. या समूहांत राव-रंक, बाल-वृद्ध, उच्च-नीच, स्त्री-पुरुष हे सारे भेद नाहीसे झालेले दिसतात. तो भावाचा भुकेला पांडुरंग आपल्या समचरणांकडे सर्वांनाच समदृष्टीनें खेंचीत असतो.

ज्येष्ठ वद्य अष्टमीच्या दिवशीं दुपारीं तीन वाजल्यापासून प्रस्थानाच्या कार्यक्रमाचा प्रारंभ होतो. पालखी मंडपांत ठेवून तींत पादुकांची यथाविधि स्थापना होते आणि मानकऱ्यांचे मान व



प्रसादाचें वितरण झाल्यावर पालखी मंदिराबाहेर पडते. रात्रीं पालखीचा मुक्काम गांवांतील आजोळघरांत होतो आणि नवमीच्या दिवशीं सकाळीं स्वारी आळंदीची वेस ओलांडून बाहेर निघते. पुढें ज्ञानोबाचा घोडा, बरोबर भरजरी चवऱ्या, कलाबतूचें अबदागीर, सोनेरी छत्री, रुप्याचे दंड, सेवेकरी, चोपदार असा सर्व थाट असतो. दहा हजार वारकऱ्यांच्या भक्तिसैन्यासह हा ज्ञानियांचा राजा पांडुरंगाच्या भेटीसाठीं पुलावरून जाऊं लागला कीं गांवांतील नागरिकांच्या मनांत स्वारीच्या वैभवाचा आनंद आणि अल्पकालीन वियोगाचें दुःख दाटून येतें.

संत नामदेवांनीं एका अभंगांत या भक्तमेळ्याचें हृद्यंगम चित्र रेखाटलें आहे :

आज महासुखें सृष्टी भरली भाग्यवंतीं । जालीसे विकृति पापतापा ॥
चालिले देखोनि वैष्णव जगजेठी । उभविती वैकुंठीं गुढिया देव ॥
आले रे आले रे हरीचे डिंगर । वीर वारीकर पढरीचे ॥
ज्यांची चरणधुळी उधळे गगनपंथें । ब्रह्मादिका तेथें जाली दाटी ॥

एकमेकांपुढें उडविती माथे । म्हणती आम्हातें लागो रज ॥
भक्ति प्रेम भाव भरले ज्यांच्या अंगीं । नाचती हरिरंगीं, नेणती लाजू ॥
हर्षे निर्भर चित्तीं आनंदें डोलती । हृदयीं कृष्णमूर्ति भेटों आली ॥
कोंदलें हरिरूप देखती विश्वाकार । सुटले पाझर नयनकमळीं ॥
गुढिया रोमांकुरीं सात्त्विकें वाटले । गर्जती विठ्ठलें नामघोष ॥
मोरपिसा कुंचे भाट गरुडटके । भार ते नेटके मिरविताती ॥
तेथें केशवाचे नामें तनु हे तुळिका केली । पायघडी घातली हरिच्या दासा ॥

अशा थाटांत ज्येष्ठ वद्य नवमीला आळंदीहून निघालेली पालखी पुणें, सासवड, शिवरी, जेजुरी, वाल्हें, निरा, लोणंद, तरडगांव, फलटण, वेडणी, बरड, राजुरी, नातेंपुतें, माळशिरस, वेळापूर, शेगांव, वाखरी या मार्गानें पंढरपूर गांठते. १६० मैलांचा प्रदीर्घ मार्ग दोन आठवडे रात्रंदिवस भक्तिरंगानें रंगून जातो. हा सुखद सोहळा अनुभवलेल्या एका भाग्यवंतानें लिहिलें आहे : "पालख्यांचा सोहळा चालू करण्याचा संकल्प हाच कीं, मराठणाच्या सर्व भागांतून धर्म, संस्कृति, श्रद्धा, भक्ति यांना ताजेपणा यावा...हरिभक्तीच्या अमृपाटांनीं सांसारिक जीवांच्या चित्ताचे मळे भिजावे, तेथें सद्‌वृत्तीचे कोंब उगवावे आणि तेथील सर्व प्रदेश लवलवीत व्हावा; कोठें नीतीचे वृक्ष वठून गेले असतील, तर त्यांना जीवनकला यावी; कोठें अधर्माचीं रानें माजलीं असतील, तर तीं निपटून जावीं; .... सत्प्रवृत्तीच्या बीजांना नवी पालवी फुटावी, सज्जनांच्या मेळ्यांना शांतिसमाधान प्राप्त व्हावें."

नगर-प्रदक्षिणा :

आळंदीच्या देऊळवाड्यांतील देवतांचें दर्शन आणि देऊळ-वाड्यांतील उपासना व महोत्सव यांच्या आठवणी चाळवून झाल्यावर आपण नगर-प्रदक्षिणेच्या वाटेवर पाऊल ठेवूं,

ज्ञानेश्वरांचें दर्शन घेऊन आणि देऊळवाड्यांतील प्रदक्षिणा पुरी करून बाहेर आल्यावर, महाद्वारांतील हैबतरावांच्या पायरी-जवळ पूर्व बाजूला हैबतरावांचे मित्र महादेवबाबा यांच्या पादुकांचें लहान मंदिर आहे. कोळी जातीच्या या सत्पुरुषानें बाबांच्या नंतर ज्ञानेश्वरांची सेवा आवडीनें केली. महाद्वाराच्या डाव्या बाजूनें नगर-प्रदक्षिणा करीत असतां हरिहरेंद्रस्वामींचा मठ लागतो. हे नाथपंथी साधु शके १६८३ मध्यें पैठणाहून आळंदीस आले; आणि अर्ध-शतकावर ज्ञानेश्वरांची उपासना करून शके १७४१ मध्यें समाधिस्थ झाले. त्यांच्या समाधीजवळच त्यांच्या शिष्यपरंपरेंतील तीन सत्पुरुषांच्या समाधि आहेत.


हरिहरेंद्रांच्या मठावरून पुढें गेल्यावर नाइकांची धर्मशाळा लागते. या नदीकांठच्या सुंदर धर्मशाळेंत दत्तमंदिर आहे. पंढर-पुराहून आलेली पुंडलिकाची पालखी याच मंदिरांत उतरते. या मंदिरामागें विष्णुपद आहे. इंद्रायणीचा घाट उतरून डाव्या बाजूला वळलें कीं पुंडलिकाचें देऊळ लागतें. या देवळाच्या मागें चक्रतीर्थ आहे. पुंडलिकाला प्रदक्षिणा घालून पुढें गेल्यावर वारकऱ्यांच्या प्रसिद्ध पुढाऱ्यांचीं स्मारकें लागतात. आधुनिक काळांत ज्ञानेश्वरी, नाथ-भागवत आणि तुकाराम-गाथा या वारकऱ्यांच्या प्रस्थान-त्रयीचा प्रचार-प्रसार करून वारकरी संप्रदायाचें संघटन-संवर्धन ज्यांनीं केलें ते जोगमहाराज, विठोबाअण्णा आजरेकर, कबीर-बुवा, लक्ष्मणबुवा इगतपुरीकर, मारुतीबुवा गुरव इत्यादि सत्पुरुष इथें विसांवले आहेत. या समाधिवृंदावनांचें दर्शन घेऊन पुढें गेल्यावर मल्लाप्पा वासकरांची समाधि लागते. मल्लाप्पा वासकर (शके १६२९–१७२१) हे निळोबांचे प्रशिष्य. संप्रदायाची वीणा तुकाराम-निळोबा-शंकरस्वामी शिऊरकर या परंपरेनें त्यांच्याकडे आली. म्हणून पंढरीच्या वारकरी फडांत वासकरांच्या फडाला

मोठा मान असतो. मल्लाप्पांनीं शके १७२१ च्या कार्तिक वद्य अष्टमीस आळंदी येथें देह ठेवला.

मल्लाप्पांच्या समाधीचें दर्शन घेऊन पुढें डाव्या बाजूनें गोपाळपुऱ्याकडे जातांना नृसिंहसरस्वतींचा मठ लागतो. हें शंकराचार्यांच्या परंपरेंतील शृंगेरी मठाचे अधिपति बदरिकाश्रमीं दीर्घकाळ तप आचरून आणि तीर्थयात्रा करून जेव्हां पंढरीस आले, तेव्हां तेथील भक्तीच्या रंगानें त्यांचें हृदयपरिवर्तन झालें. त्यांनीं दंड-कमंडलूचें चंद्रभागेंत विसर्जन केलें आणि गळ्यांत तुळशीची माळ घालून वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली. ते शके १७९६ मध्यें आळंदीस आले. ज्ञानेश्वरांच्या चरणांच्या सान्निध्यांत त्यांना जीवनाचें परमनिधान सांपडलें आणि ते येथेंच राहिले. आळंदी येथें बारा वर्षांचा काळ ज्ञानेश्वरांच्या समाधीची उपासना करीत आणि ज्ञानेश्वरीवरील प्रवचनांनीं भक्तीचा प्रसार करीत व्यतीत केला आणि शके १८०७ मध्यें ( पौष शुद्ध १५ ) त्यांनीं समाधि घेतली.

नृसिंहसरस्वतींच्या समाधीनंतर गोपाळपुरा, ज्ञानेश्वर उद्यान आणि सिद्धबेट हीं ठिकाणें क्रमानें पाहून गेल्या मार्गानेंच परतल्यावर गोपाळपुऱ्यांतील गोपाळकृष्णाच्या पुढें डाव्या बाजूला दादामहाराज सातारकरांची व उजव्या बाजूला शेठ देवीदासांची धर्मशाळा लागते. येथून पुढें प्रदक्षिणेच्या वाटेनें दोन्ही बाजूंना अनेक ज्ञातिसमूहांच्या धर्मशाळा आहेत.

नगर-प्रदक्षिणेच्या वाटेनें मंडईवाल्यांच्या धर्मशाळेच्या पुढें गेल्यावर ज्ञानेश्वरांनीं चालवलेली भिंत लागते. वाघावर बसून आणि हातांत सर्पाचा चाबूक घेऊन आलेल्या योगी चांगदेवाचें गर्वहरण करण्यासाठीं ज्ञानेश्वरांनीं जड भिंड चालविली, असा चमत्कार सांगितला जातो.



REFBK-0015053

ज्ञा


चालविली जड भिंती । हरली चांगयाची भ्रांती ।
मोक्षमार्गीचा सागाती । ज्ञानोबा माझा ॥

असा या प्रसंगाचा उल्लेख एकनाथांनीं केला आहे. सध्यांची स्मारक-भिंत खानदेशांतील चंद्रभागाबाई नांवाच्या बाईंनीं शके १७५९ मध्यें बांधून तीवर निवृत्तिनाथादि चार भावंडांच्या मूर्ति आणि त्यांच्यासमोर चांगदेवाची मूर्ति बसविली. या भिंतीचें दर्शन घेऊन मोटार-तळावरून इंद्रायणीच्या घाटावर पुंडलिकाच्या मंदिरापाशीं परत आल्यावर नगर-प्रदक्षिणा पूर्ण होते.

❖ ❖ ❖

ज्ञानेशाचा आणि इंद्रायणीचा निरोप घेतांना मनांत भावनांचे कल्लोळ उसळतात. आपल्या क्षुद्र जिण्याची, अहंकाराची, वासनांची आणि भक्तिहीन पोपटपंचीची लाज वाटूं लागते. कांहीं तरी समजल्यासारखें, सांपडल्यासारखें वाटूं लागतें; समस्यांच्या गर्भांतूनच उत्तरांची उकल होऊं लागते.

○ ○ ○




# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

संदर्भ:

लोहमार्ग — सडक
मोटार रस्ता — नदी

स्केल — मैल

० २० ४० ६० ८० १००

पंढरपूर–पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी – ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ; जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम, त्र्यंबकेश्वर-नाशिक – श्रीराम; चिंचवड – मोरया गोसावी, कोल्हापूर – महालक्ष्मी, औदुंबर-नरसोबाची वाडी – दत्तात्रय; तुळजापूर–भवानी, नेवासें–मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें–शांतादुर्गा, मंगेश–शंकर, भीमाशंकर – ज्योतिर्लिंग, परशुराम – परशुराम, शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे, गाणगापूर – नरसिंह सरस्वती; माहूर – दत्त, देवी, आंबे जोगाई– देवी, औंढ्या नागनाथ – ज्योतिर्लिंग; परळी वैजनाथ – ज्योतिर्लिंग, वेरूळ – लेणी, ज्योतिर्लिंग, नांदेड – गोदावरी, बीड – कंकालेश्वर, रामटेक – सीता-राम, सालबर्डी – यात्रा, अमरावती – अंबादेवी; मुक्तागिरी जैन-क्षेत्र, चांदा – महाकाली, शेगांव – गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग, कळम्ब – चिंतामणी, दक्षिणद्वार देवगिरी – दौलताबाद. • • •